0 3 MAY 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू स्मृती सप्ताहास ग्रंथ प्रदर्शनाने प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहास सोमवारी सायंकाळी विशेष ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाने प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.



**कोल्हापूर : विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. भारती पाटील आदी.**

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारात राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले असून, यात ११५ ग्रंथ समाविष्ट आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची चरित्रे, कागदपत्रे, छायाचित्रे व शाहू महाराजांशी निगडित अनेक दुर्मीळ ग्रंथांचा समावेश आहे. विद्यापीठाने प्रकाशित केलेले 'राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स'चे ९ खंड, राजर्षी शाहू केंद्रामार्फत सुरू करण्यात आलेल्या राजर्षी शाहू साहित्यमालेअंतर्गत प्रकाशित पुस्तके, शाहू महाराजांची विविध संशोधकांनी लिहिलेली बहुविध भाषांतील दुर्मीळ चरित्रे, महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित राजर्षी शाहू चरित्राची साधने यांचा समावेश या प्रदर्शनात आहे. 'डॉ. जयसिंगराव पवार यांची शाहू चरित्र साधना' हे विशेष दालन डॉ. पवार यांच्या समग्र शाहूंविषयीच्या कार्याला समर्पित असे आहे. यात त्यांनी शाहू महाराजांविषयी लिहिलेली, संपादित केलेली तसेच देशी-विदेशी भाषांत अनुवादित झालेली पुस्तके समाविष्ट आहेत. हे प्रदर्शन ७ मेपर्यंत सकाळी ११ ते ५ या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया, डॉ. भारती पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. निलांबरी जगताप उपस्थित होते.

पुढारी

# महाराष्ट्र दिनानिमित्त विद्यापीठात विविध कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्याचा ६२ वा स्थापना दिन शिवाजी विद्यापीठात उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यापीठातील महिला कर्मचाऱ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर झांजवादनाची प्रभावी प्रात्यक्षिके सादर केली.

विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. कौटुंबिक व दैनंदिन कार्यालयीन कामकाज सांभाळून महिला कर्मचाऱ्यांनी झांजवादनासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांचे मनापासून कौतुक व अभिनंदन केले. या कलेमध्ये त्यांनी सातत्य राखावे, असे आवाहन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत उपस्थित होते.

पुण्यनगरी

# डॉ. काकडे स्मृती व्याख्यानमाला आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये शास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र काकडे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यानमाला आयोजित केली आहे. याचे दि. ३ व ४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता प्रसारण होईल, अशी माहिती डॉ. आलोक जत्राटकर, संतोष पिसे आणि सागर कुलकर्णी यांनी दिली आहे. व्याख्यानमालेचे उद्घाटन दि. ३ मे रोजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के करणार असून, प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांचे तर दि. ४ रोजी प्रा. अजित तेळवे यांचे व्याख्यान होणार आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत सादर केले. डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी उपस्थित विभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि नागरिक यांना महाराष्ट्र दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. ध्वजवंदनानंतर विद्यापीठातील महिला कर्मचाऱ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर झांजवादनाची प्रात्यक्षिके सादर केली.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, कौशल्य व उद्योजकता विकास विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत उपस्थित होते.

03 MAY 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाच स्टार्टअपना १० लाखांची कामे

## सतेज पाटील; इनोव्हेशन स्पर्धा, लोकराजा स्टार्टअप गुंतवणूकदार समिटचे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी पर्वानिमित्त आयोजित स्टार्टअप समिटमध्ये चांगल्या संकल्पनांना मूर्त स्वरुप देण्याचा मानस आहे. स्टार्टअपना प्रोत्साहन देण्यासाठी या इनोव्हेशन स्पर्धा आणि प्रदर्शनातील पहिल्या पाच स्टार्टअपना शासनाकडील १० लाखांची कामे देण्यात येतील, अशी घोषणा पालकमंत्री सतेज पाटील यांनी आज येथे केली.




**कोल्हापूर : शाहू मिलमधील कृतज्ञता पर्वांतर्गत लोकराजा स्टार्टअप सोहळ्याचे उद्‌घाटन सोमवारी झाले. यावेळी बोलताना सतेज पाटील. शेजारी एम. एस. देशमुख, राहुल रेखावार, डॉ. डी. टी. शिर्के, एम. वाय. पाटील, धनंजय महाजन, जगदीश जगताप.**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी पर्वानिमित्त शाहू मिल येथे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी आणि जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूरतर्फे आयोजित लोकराजा इनोव्हेशन स्पर्धा व प्रदर्शन, लोकराजा स्टार्टअप गुंतवणूकदार समिटचे उद्‌घाटन पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

मंत्री पाटील म्हणाले, 'या इनोव्हेशन स्पर्धेतून चांगले विषय समोर यावेत. कोल्हापुरातील तरुणांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी मदत व्हावी. चांगल्या संकल्पनांना प्रोत्साहन देण्याची भूमिका आहे. कोल्हापुरात इनोव्हेशनसाठी चांगले वातावरण असून विद्यार्थी व उद्योजकांनी सक्रिय सहभागी व्हावे. छोट्या-छोट्या गोष्टींना मोठी मागणी असून या गोष्टींचा पुरवठा करण्यासाठी स्टार्टअप एक प्रभावी माध्यम आहे. नवे विचार, नव्या संकल्पनांचा स्वीकार राज्य शासन करत असून राज्य शासनाने टेक्नॉलॉजी संबंधातील कामे स्टार्टअपना देण्याचा निर्णय घेतला आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'अडचणी सोडविण्यासाठी चांगल्या संकल्पनांचा जन्म होतो. अशा चांगल्या संकल्पनांचा जन्म कोल्हापुरात होत आहे. नवकल्पनांना वय नसते यासाठी प्रत्येकाने चांगल्या संकल्पना राबविण्यासाठी ध्यास घ्यावा. प्रा. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे डॉ. एम. एस. देशमुख, रवी डोली, एम. वाय. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, मोहन पाटील, धनंजय महाजन, जगदीश जगताप आदी उपस्थित होते.

# प्रशिक्षणासह मिळतेय रोजगाराची संधी

## शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात कौशल्याधिष्टीत १३० अभ्यासक्रम

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात भागधारकांमध्ये सकारात्मक विकास घडवून आणण्यासाठी १३० विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. या विभागातील प्रशिक्षणार्थींनी आपले स्वतःचे व्यवसाय उभारले आहेत. विद्यार्थी महिला, ज्येष्ठ नागरिक, औद्योगिक कर्मचाऱ्यांना या अभ्यासक्रमाचा चांगलाच उपयोग होत आहे. यातून एक महिना ते वर्षापर्यंतच्या कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थींचा सामाजिक, आर्थिक विकास होतो. नाममात्र प्रवेश शुल्कात रोजगाराची संधी मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागात कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण घेऊन अनेक तरुण तरुणांनी व्यवसाय सुरू केला आहे. मोडी लिपी आणि इंग्रजी भाषा प्रभुत्वामुळे अनेकांना रोजगाराची संधी



उपलब्ध झाली आहे. कमी खर्चात आणि कमी वेळेत जवळपास हजारो प्रशिक्षणार्थींना रोजगार मिळाला आहे. त्यामुळे या

**तरुण भारत** विशेष वृत्त

अभ्यासक्रमांची विद्यार्थ्यांमध्ये क्रेझ वाढत आहे.

इव्हेंट मॅनेजमेंट, गार्डनिंग, चॉकलेट मेकींग, शिलाई मशिन, यासह अन्य अभ्यासक्रमांना ३०० ते १ हजारपर्यंत शुल्क आहे. या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेण्यासाठी वयाची अट नसून कमी खर्चात आणि कमी वेळेत शिक्षण पूर्ण करता येते. त्यामुळे तरुणांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वच लोक प्रशिक्षण घेऊन व्यवसायाकडे वळत आहेत. घरातल्या घरात किचन गार्डन, टेरेस गार्डन आणि बाल्कनी गार्डन तयार करून अनेक महिलांनी दररोजची कोथींबिर, कडीपत्त्यासह भाज्यांचा प्रश्न निकाली काढला आहे. तर काहींनी ब्युटी पार्लर, छोटे–मोठे इव्हेंट, खाद्यपदार्थांचे स्टॉल, प्लंबिंगसारखी कामेही सुरू केली आहेत. या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेणाऱ्या ८० टक्के प्रशिक्षणार्थींना व्यवसाय करण्याचे प्रोत्साहन व नोकरीची संधी मिळाली आहे. त्यामुळे हळूहळू या प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांची गर्दी वाढू लागली आहे.

**सामाजिक जबाबदारी म्हणून प्रौढांना आधार**

तंत्रज्ञानाच्या युगात ई बँकिंगचे महत्व वाढले आहे. ई बँकीगमध्ये ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक होऊ नये म्हणून त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच त्यांचा विरंगुळा व्हावा म्हणून ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याख्यान, विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामुळे या केंद्राचा वृध्दांना चांगला लाभ होत आहे.



**विद्यार्थ्यांना नोकरीयोग्य बनवले जाते**

विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिक त्याचबरोबर शिक्षणाचा गॅप पडलेल्या आणि शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्यांना या अभ्यासक्रमाचा लाभ होत आहे. सातवी व आठवी उत्तीर्ण कोणीही या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे समाजातील विविध घटकांनी हा अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःला नोकरी व रोजगार योग्य बनवावे. कौशल्य विकसित झाल्याने छोटे–मोठे उद्योग, योगा, मेहंदी क्लास सुरु केले आहेत.

**डॉ. ए. ए. गुरव, समन्वयक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**सुरु असलेले अभ्यासक्रम**

बालवाडी प्रशिक्षण, ग्रंथालय व्यवस्थापन, ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी भाषा प्रभुत्व, मोडी लिपी, सेल्समनशिप, प्राकृत भाषा आणि जैन धर्म, फॅशन डिझायनिंग, टॅली, सुगम संगीत, हार्मोनियम, तबला, बेसिक ड्रॉईंग आणि पेंटिंग, शाहिरी कला, ब्युटी पार्लर, इव्हेंट मॅनेजमेंट, योगा, शेअर मार्केट, हिंदी अनुवाद, ड्रेस डिझायनिंग, बेसिक कथ्थक, इलेक्ट्रिकल घरगुती उपकरणांची देखभाल आणि दुरुस्ती, रेडिओ जॉकी, सुगंधित आणि औषधी वनस्पतींचा परिचय, मेहंदी, योग आणि निसर्गोपचार, रोपवाटिका व उद्यान कौशल्य, ई–बँकिंग, उद्योजकता आणि व्यवस्थापन, कोल्हापुरी दागिन्यांचे डिझायनिंग, हॉटेल कामगारांसाठी संवाद कौशल्य, कोल्हापुरी खाद्यपदार्थ, चायनीज फूड, कायदेशीर साक्षरता, किचन व टेरेस गार्डन, सजावटीचे साहित्य तयार करणे, क्लॉथ पेंटिंग, पॉट पेंटिंग यासह अन्य १३० विषयाचे प्रशिक्षण दिले जाते.

तरुण भारत

# उन्हाळी परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय

**कोल्हापूर :** राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाईन की ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात, यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाने कुलगुरूंची बैठक बोलावली होती. या बैठकीत सर्व विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय झाला, तसे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले. राज्य शासनाच्या मार्गदर्शन सूचनांनुसार सोमवारी शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेची बैठक झाली. या बैठकीत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



**शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय**

**येत्या दोन दिवसात परिपत्रक होणार जाहीर**

राज्य शासनाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठातील उन्हाळी परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय विद्या परिषदेने घेतला आहे. त्यासंदर्भातील परिपत्रक येत्या दोन दिवसात जाहीर केले जाईल. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना मिळाल्याशिवाय विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईन की ऑनलाईन पध्दतीने घ्यायच्या हे विद्यापीठ जाहीर करू शकत नाही. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विद्यापीठांना पाठवलेल्या सूचनांचा आदर करीत, उन्हाळी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेतल्या जातील, असा निर्णय सर्वानुमते जाहीर केला. या बैठकीला विद्या परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

तरुण भारत

# खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत नंदिनीला सुवर्ण

## अंतिम लढतीत दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या मल्लावर मिळवला एकतर्फी विजय

प्रतिनिधी
कोल्हापूर

बेंगळुर येथे झालेल्या खेलो इंडिया विद्यापीठ गेम्सअंतर्गत झालेल्या मुलींच्या कुस्ती स्पर्धेतील अंतिम लढतीत मुरगुड (ता. कागल) नंदिनी साळोखेने दिल्लीची आंतरराष्ट्रीय पदक विजेती सिमरनला १०-० गुणांनी एकतर्फी हरवून सुवर्णपदकाची कमाई केली. या कुस्ती स्पर्धेत नंदिनीने शिवाजी विद्यापीठातर्फे प्रतिनिधीत्व केले.



स्पर्धेच्या पहिल्या कुस्तीत नंदिनीने उत्तर प्रदेशच्या निशा तोमर हिला १०-० अशा गुणांनी पराभूत केले. दुसऱ्या लढतीतही नंदिनीने औरंगाबाद विद्यापीठच्या सोनाली गाडगे हिला १०-० गुणांनी पराभवाची धुळ चारुन उपांत्य फेरीत केला. हरियाणा येथील एमडीओ विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय पदक विजेती हनीकुमारी हिच्या विरुद्ध नंदिनीचा उपांत्य सामना झाला. अटीतटीने झालेल्या या सामन्यात नंदिनीने बाजी मारत हनीकुमारीला १५-१४ अशा गुणफरकांनी पराभूत करुन अंतिम फेरीत धडक दिली. अंतिम लढतीत नंदिनीने सिमरनला हरवून सुवर्णपदक जिंकण्याची किमया केली.

03 MAY 2022
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जय जय महाराष्ट्र माझा...

## महाराष्ट्र, कामगार दिन सर्वत्र उत्साहात : शहरातील विविध शाळांमध्ये ध्वजारोहण : विद्यापीठ महिला कर्मचाऱ्यांनी केले झांजपथकाचे सादरीकरण

प्रतिनिधी
कोल्हापूर


शहरातील विविध शाळा, ज्युनिअर कॉलेजच्या वतीने महाराष्ट्र व कामगार दिन साजरा करण्यात आला. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

**शिवाजी विद्यापीठ**

महाराष्ट्र दिन व कागार दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महिला कर्मचाऱ्यांनी झांजपथकाची प्रात्यक्षिके सादर केली. महिला कर्मचाऱ्यांनी जपलेल्या कलेचे कौतुक कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत, आदी उपस्थित होते.

**विद्यापीठ हायस्कूल ज्युनिअर कॉलेज**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य के. पी. वायफळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एन. ए. ढगे, मुख्याध्यापक एस. वाय. कुंभार, उपमुख्याध्यापिका एस. व्ही. रणनवरे, बी. डी. गोसावी, एच. एम. गुळवणी, आदी उपस्थित होते.





कोल्हापूर : महाराष्ट्र, कामगार दिनानिमित्त ध्वजारोहण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, गजानन पळसे, अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. नमिता खोत आदी. दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त झांजपथकाची प्रात्यक्षिके सादर करताना विद्यापीठातील महिला कर्मचारी.

**श्रीदत्ताबाळ हायस्कूल**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी जुलेखा नायकवडी यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा, माजी नगरसेविका पल्लवी देसाई, सेक्रेटरी माजी नगरसेविका निलेश देसाई, विश्वस्त वेद देसाई, व्यवस्थापक संदीप डोंगरे, मुख्याध्यापिका रोहिणी शेवाळे, मुख्याध्यापक सचिन डवंग, मुख्याध्यापिका किर्ती मिठार, प्रणिता वर्धमाने आदी उपस्थित होते.

**शिवाजी मराठा हायस्कूल व सखारामबापू खराडे कॉलेज**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त यु. जी. ठोंबरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक पी. डी. काटकर, पी. आर. अस्वले, एस. के. गुरव, एस. के. पाटील आदी उपस्थित होते.

**देशभूषण विद्यामंदिर हायस्कूल**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त मुख्याध्यापक आर. ए. गाट यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी व्ही. ए. पाटील, एस. बी. मिठारी, एम. एस. माने, एमस. आर. भेंडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**इंदिरा गांधी विद्यानिकेतन**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त मुख्याध्यापिका एम. आर. मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि महाराष्ट्र गीत सादर केले. के. एन. सुतार यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्व सांगितले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

**वि. स. खांडेकर प्रशाला**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त शिक्षकेतर कर्मचारी प्रमोद खांबे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका नेहा कानकेकर, आर. बी. भोई, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**जिल्हा खादी ग्रामोद्योग संघ**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त प्राचार्य व्ही. डी. माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. खादी संघाचे अध्यक्ष सुंदरराव देसाई यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्व सांगितले. सचिव एस. एस. तुपद, प्रा. सदाशिव मनुगडे, संचालक सखाराम सुतार, गीताताई गुरव, सविता देसाई शकुंतला घोडके, छाया भोसले, बी. डी. चौगुले आदी उपस्थित होते.

**कळंबा गर्ल्स हायस्कूल**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त मुख्याध्यापिका एस. ए. जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्षा एल. एस. सावंत, खजानीस एस. एस. आडसूळ, सरस्वती सावंत, एस. बी. सोनाळकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


**सुनितादेवी सोनवणे ज्ञानगंगा हायस्कूल**

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थापक जी. एस. पाटील, धनाजी बेलेकर, महेश पाटील, मनिषा शिरगावे, सागर आळवेकर, दत्तात्रय कोळेकर, गजानन काटकर, सतीश माळवी, नितीन विभुते आदी उपस्थित होते.

# पंचगंगा नदीची स्थिती शिरोलीच्या पुढे चिंताजनक

## 'सकाळ' राजर्षी शाहू कृतज्ञता जलदिंडीच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाने घेतले नमुने

पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण




सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : पंचगंगा नदीच्या पाण्याची चाचणी 'सकाळ'च्या राजर्षी शाहू कृतज्ञता जलदिंडीच्या निमित्ताने घेतली. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांनी नमुने घेऊन तपासणी केली. त्यातून पंचगंगा नदीची एकूण स्थिती शिरोली पुलापासून पुढे अतिशय चिंताजनक आहे. पाण्याचा रंग गढूळ असून, फॉस्फेटचे प्रमाणही अधिक आहे. तेरवाड बंधाऱ्याजवळ नायट्रेटचे प्रमाण अधिक असल्याने तेथे जलपर्णी वाढली आहे. शिरोली पुलावाजवळ पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे २.४ इतका आहे. तर तिथून पुढेही विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमीच आहे. दुधाळी येथे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प झाल्याने शहराच्या हद्दीमधील नदी पात्रातील पाण्याची स्थिती पूर्वीच्या तुलनेत सुधारली आहे.

पंचगंगा प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने 'सकाळ'ने 'पुन्हा साथ द्या, चला पंचगंगा वाचवूया' हे अभियान राबवले. या अंतर्गत पिरळ ते नृसिंहवाडी या दरम्यान नदीपात्रातून राजर्षी शाहू कृतज्ञता जलदिंडीचे आयोजन केले होते. यात नदी पात्रातील पाण्याचे विविध बंधाऱ्यांजवळ नमुने घेतले. त्यांचे परीक्षण करून नदीतील पाण्याची स्थिती कशी आहे. याचा अहवाल शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने बनवला.

### विरघळलेला प्राणवायू

- पिरळ ते शिंगणापूरपर्यंत प्राणवायूचे प्रमाण योग्य
- राजाराम बंधारा ते रुईदरम्यान हे प्रमाण कमी
- कबनूर ते नृसिंहवाडीदरम्यान प्राणवायूच्या प्रमाणात चढ-उतार दिसतो (तापमानातील फरक, जलपर्णीचे प्रकाशसंश्लेषण, नैसर्गिक व यांत्रिक बोटींमुळे होणारे वायुविजन यामुळे हा चढ-उतार दिसतो)

**अहवालातील निष्कर्ष**

| बंधारा | रंग | विरघळलेला प्राणवायू | फॉस्फेट | नायट्रेट | पीएच (सामू) | क्लोरिन |
|---|---|---|---|---|---|---|
| पिरळ | गढूळ नाही | ६.६ | ४ | २ | ७.०३ | १८ |
| तारळे | गढूळ नाही | ६.४ | ४.४४ | ३ | ६.९७ | ७ |
| अवळी | गढूळ नाही | ६.३ | २ | २ | ७.११ | ८ |
| शिरगाव | गढूळ नाही | ६.२ | २.५ | ४ | ७.०२ | १० |
| बेले, परिते | गढूळ नाही | ५.९ | ३.०७ | ३ | ७.२३ | ९ |
| हळदी | गढूळ नाही | ६.३ | ८ | ४ | ६.९५ | ७ |
| बीड | गढूळ नाही | ६.४ | १० | ५ | ७.३८ | ७ |
| कोगे | गढूळ नाही | ५.१ | ५ | ५ | ७.१९ | ८ |
| प्रयाग चिखली | गढूळ नाही | ६.१ | ४ | ७ | ७.९९ | ९ |
| पंचगंगा घाट | गढूळ नाही | ५.३ | ४ | १०.११ | ८.१३ | १० |
| राजाराम बंधारा | गढूळ नाही | ४.३ | १० | १३.४५ | ७.०१ | ११ |
| शिरोली पूल | हिरवट रंग | २.४ | १० | १६.२ | ६.३६ | ११ |
| सुर्वे बंधारा | हिरवट रंग (दुर्गंधी) | २.८ | ६.६६ | १७.०२ | ७.१९ | १९ |
| रुकडी | हिरवट रंग (दुर्गंधी) | ४.६ | १० | १६.४ | ७.५३ | १७ |
| रुई | हिरवट रंग (दुर्गंधी) | ४.६ | ५.७१ | १५.४ | ७.४५ | २१ |
| इचलकरंजी | हिरवट रंग (दुर्गंधी) | ४.९ | ८ | १७.२ | ८.०७ | २४ |
| तेरवाड | हिरवट रंग (दुर्गंधी) | ४.८ | १० | २०.३३ | ७.७७ | ४९ |
| नृसिंहवाडी | गढूळ नाही | ५.३ | ६.६६ | १८.६ | ८.२६ | ८७ |

### पाण्यात विरघळलेले घटक

पाण्यात प्रामुख्याने कर्बोदके, फ्लोराईड, सल्फेट, फॉस्फेट, नायट्रेट्स व मातीच्या कणांमुळे पाण्याची घनता वाढत आहे. नदीच्या उगमापासून कोल्हापुरातील दुधाळी नाल्यापर्यंत हे प्रमाण खूप कमी आहे; मात्र दुधाळी नाला, जयंती नाला व इचलकरंजी ते नृसिंहवाडीदरम्यान याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

### गढूळता

मैलामिश्रित सांडपाणी, माती मिसळल्यामुळे पाण्यातील रोगजंतूचे प्रमाण वाढत आहे. पाण्यातील गढूळता उगमापासून संगमापर्यंत ३ ते ११ एनटीयू (गढूळता मोजण्याचे परिमाण) दरम्यान आढळते.

### नायट्रेट व फॉस्फेटचे प्रमाण वाढते

नदीकाठांवरील शेतांतून वापरली जाणारी नायट्रेटयुक्त खते, मिसळणारे घरगुती सांडपाणी, साबण, कारखान्यातील सांडपाणी, कपडे, वाहने व जनावरे धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साबणामुळे नायट्रेट व फॉस्फेटच्या प्रमाणात वाढ होत आहे. ही वाढ जलपर्णी वाढीस पोषक आहे. राजाराम बंधारा, रुई बंधारा, हेरवाड, तेरवाड येथे हे प्रमाण अधिक दिसते. हेरवाडपासून पुढे नदीचे पात्र जलपर्णीखालीच दडल्याचे दिसते.

### अशी आहे स्थिती

- **रंग** - पिरळपासून राजाराम बंधाऱ्यापर्यंत पाणी गढूळ किंवा हिरवट नाही. पुढे शिरोली, तेरवाड येथे हिरवट रंग
- **वास** - पिरळ ते शिंगणापूर बंधारा पाण्याला वास नाही. सुर्वे बंधारा, इचलकरंजी, तेरवाड येथे दुर्गंधी
- **तापमान** - नदीच्या पाण्याचे सरासरी तापमान २५ ते ३० डिग्री सेल्सियस
- **सामू (पी.एच)** - पाण्याचा सामू ६.९५ ते ८.२६ पर्यंत आहे. (योग्य प्रमाण)
- **पाण्यातील विरघळलेला ऑक्सिजन**-प्रमाण राजाराम बंधाऱ्यापर्यंत योग्य, शिरोली पुलाजवळ सर्वात कमी म्हणजे २.४ इतका आहे. तेथून पुढे या प्राणवायूचे प्रमाण मानांकनापेक्षा कमी
- **नायट्रेट** - राजाराम बंधाऱ्यापर्यंत नायट्रेटचे प्रमाण योग्य, पुढे तेरवाड बंधाऱ्याजवळ प्रमाण वाढल्याने जलपर्णी वाढली
- **फॉस्फेट** - बिड, राजाराम बंधारा, शिरोली पूल, रुकडी, तेरवाड येथे अधिक

### पाण्याचे १२ मे २०११ मध्ये केलेले परीक्षण व त्याचे निष्कर्ष

**रंग -**

- नदीतील पाण्याचा रंग प्रदूषणाचे स्वरूप दाखवितो. विरघळलेल्या घटकांवर नदीचा रंग ठरतो
- पिरळ ते शिरगाव बंधाऱ्यादरम्यान पाणी स्वच्छ व पारदर्शक
- इचलकरंजी पाणी ओढा येथे हिरवट बनते
- तेरवाड, नृसिंहवाडी येथे पाण्याचा रंग काळपट

**गंध -**

- घरगुती, कारखान्यातील सांडपाणी सातत्याने नदीत मिसळत गेल्याने दुधाळी नाल्यापासून पाण्याला विशिष्ट गंध येऊ लागतो.
- नृसिंहवाडीपर्यंत हा गंध वाढत जातो.

**सामू** - (आम्ल व अल्कलीचा पाण्यावर होणारा परिणाम)

नदीमधील सामू ७ ते ८.५ दरम्यान आहे. इचलकरंजी ते नृसिंहवाडीदरम्यान कारखान्यातील रसायने मिसळल्यामुळे तेथील पाण्यात अल्कलीचे प्रमाण फारच जास्त असल्याचे स्पष्ट होते. (स्टँडर्ड प्रमाण)

### यांनी घेतला सहभाग

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रोत्साहनातून हा उपक्रम झाला. पर्यावरण विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापक डॉ. पल्लवी भोसले, निर्मला पोखरणीकर, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, पूजा घर्मोशी, प्राजक्ता सरकाळे, प्रिया वसगडे, संजीवनी चौगुले या शिक्षकांनी नदीच्या पाण्याचे नमुने घेऊन त्याची तपासणी करून निष्कर्ष काढले. यामध्ये प्रतिज्ञा पवार, अश्विनी क्षीरसागर, सौरभ कानडे, निखिल बोंगार्डे, सूरज मोहिते, निखिल काळगे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.